# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १६/०८/२०२५ (रविवार)**

---

## पोलीस स्टेशन देवलापार अंतर्गत प्राणांतीक अपघातातील दोषी वाहन आणि चालक निष्पन्न कृत्रिम बुध्दीमत्ता मार्वेल (Artificial intelligence -MARVEL) द्वारे घेतला आरोपीचा शोध

दिनांक १०/०८/२०२५ रोजी अमित भुरा यादव, वय ३५ वर्ष, रा.लोणारा, पोस्ट गुमती, जिल्हा नागपूर हा त्याची पत्नी नामे ग्यारसी अमित यादव, वय ३० वर्ष हीचे सह मोटर सायकल जात असतांना देवलापार हद्दीतील मोरफाटा दर्गाह शिवारात झालेल्या अपघातात ग्यारसी अमित यादव या अपघातात मयत झाल्या. फिर्यादी नामे अमित भुरा यादव याचे बयाणा वरून पोस्टे देवलापार येथे दि. ११/०८/२०२५ रोजी अपराध क्रमांक ३५४/२०२५ कलम २८१, १०६ (१) भा.न्या.स अधिनियम २०२३ सहकलम १८४, १३४(ब) मोटर वाहन अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा नोंद करून तपासात घेण्यात आला.

सदर गुन्हयात आरोपी आणि वाहन निष्पन्न नव्हते. सदर गुन्हयाचे तपासात देवलापार पोलीसांनी मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात कृत्रिम बुध्दीमत्तेचा वापर करत (Artificial intelligence -MARVEL) द्वारे सी.सी.टी.व्ही. फुटेज ची तपासणी करून सदर गुन्हयात अपघात करणारे वाहनाचा क्रमांक यु.पी. १४ एम.टी. २१९० (लाल रंगाचा टाटा कंपनीचा ट्रक) निष्पन्न करून नमुद वाहनाचा चालक नामे सत्यपाल राजेंद्र, वय २८ वर्षे, रा. नगला खरीक, महोई, फरूखाबाद, राज्य उत्तरप्रदेश याला दिनांक १६/०८/२०२५ रोजी त्याच्या घरून वाहनासह ताब्यात घेतले आहे. **आरोपी आणि वाहनाबाबत काहीही सुगावा नसतांना कृत्रिम बुध्दीमत्ता मार्वेल (Artificial intelligence -MARVEL) द्वारे पोलीसांनी सदर गुन्हयात आरोपी आणि वाहन निष्पन्न केले आहे.**

# अवैधरित्या देशीदारू, मोहाफुल दारू, विदेशी दारू बाळगणाऱ्या/विक्री तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांवर,नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई, ९७ गुन्हे नोंद एकुण १,२४,२९५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त

**नागपुर ग्रामीण जिल्हयात दिनांक १५/०८/२०२५ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री आणि सेवन करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू आणि विदेशी दारू असा एकुण १,२४,२९५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**पोलीस स्टेशन रामटेक** येथे आरोपी नामे ०१) सुनिल मुनेश कठौते,वय ५० वर्ष, रा.वार्ड क्र ०२, रामटेक, ०२) राजकुमार हरिचंद्र मसराम, रा महाराजपुर आणि दोन महीला आरोपी यांचे वर प्रत्येकी एक गुन्हा नोंद आहे.

**पोलीस स्टेशन देवलापार** येथे आरोपी नामे १) सुरेद्र यादोराव किरनाके, वय ३४ वर्ष, रा. वनपवनी,ता.रामटेक ,२) राजु बापुराव उईके, वय ३६ वर्ष, रा.खापा, ता.रामटेक, ३) मोहन भैयालाल वरठी, वय ६० वर्ष, रा.कटटा, ता.रामटेक,४) चंपालाल कोडवते, रा तुमडीटोला ता. रामटेक ५) विलास केशवराव हरडे, वय ५० वर्ष, रा. बेलदा, ता.रामटेक आणि ६) एक महीला आरोपी यांचे वर प्रत्येकी एक गुन्हा नोंद आहे.

**पोलीस स्टेशन आरोली** येथे आरोपी नामे १) राहुल विश्वनाथ मदनकर वय ३३ वर्षे रा. रेवराल आणि २) ग्यानी वामन ढोबळे वय ४१ वर्षे रा. याचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे,

**पोलीस स्टेशन पारशिवणी** येथे आरोपी नामे १) रविंद्र भाउराव मोरे, वय २९ वर्ष, रा बोरबन वार्ड नं २ पारशिवनी, २) राजेश गेंदलाल दियेवार, वय ५० वर्षे रा— साकरला ,ता—पारशिवनी, ३) रोशन विजयकुमार जैन वय ४१ वर्षे रा— पारशिवनी, ४) अजित महादेव कुमरे वय २१ वर्ष रा बनेरा ता पारशिवनी जि नागपुर यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे.

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे आरोपी नामे १) सुफल प्रल्हाद बाग, वय ६४ वर्ष, रा. चिचभवन निमजी खदान, २) सुफल प्रल्हाद बाग, वय ६४ वर्ष, रा. चिचभवन, निमजी खदान ३) अजमेरसिंग धरमसिग अंधरेले, वय ४८ वर्ष, रा. वार्ड क्र. १५ कळमेश्वर , ४) कपुरसिंग उजागरसिग अंधरेले, वय ४२ वर्ष, रा. सरदार मोहल्ला ,वार्ड क्र. १५ कळमेश्वर, ५) उजागरसिंग धरमसिंग अंधरेले, वय ५५ वर्ष, रा. सरदार मोहल्ला वार्ड क्र. १५ कळमेश्वर, ६) पंकज देवाजी गायकवाड, वय ४४ वर्ष, रा. वार्ड क्र. ०३, सेलु, कळमेश्वर,७) रिशीकांत योगेश्वर चर्जन, वय ३३ वर्ष, राह. वार्ड क्र. ०९, मोहपा, कळमेश्वर आणि दोन महीला आरोपी यांचे वर प्रत्येकी एक गुन्हा नोंद आहे.

**पोलीस स्टेशन खापा** येथे १) सुखचंद्र रामजी सोमकुवर, वय ३६ वर्ष, रा. टेकाडी, ता. सावनेर जि. नागपुर, २) मिलींद अंरवीद धार्मीक, वय २९ वर्षे, रा येवलेकर वार्ड शिवमंदीरजवळ खापा, ३) किशोर धंनराज पिपरेवार, वय ३६ वर्षे, रा कोथुळना, ४) महादेव चोखीनाथ वंजारी, वय ४२ वर्ष, रा. वाकी, आणि आरोपी क्रं ५)एक महीला आरोपी यांचे वर प्रत्येकी एक गुन्हा नोंद आहे.

**पोलीस स्टेशन केळवद** येथे आरोपी नामे १)श्याम देवाजी नारनवरे, वय ४२ वर्ष रा ढालगाव खैरी ,ता. सावनेर जि नागपुर आणि दोन महीला आरोपी यांचे वर प्रत्येकी एक गुन्हा नोंद आहे.

**पोलीस स्टेशन सावनेर** येथे आरोपी नामे १) भागवत भाऊराव भालेराव, वय ४३ वर्ष रा. वार्ड क्र १७, पहलेपार, सावनेर ता. सावनेर आणि २) (पाहीजे आरोपी) रवि हंबरडे, रा.सावनेर यांचेवर एक गुन्हा ३) क्रिष्णा श्शामराव ढोके, वय ५८ वर्षे, रा वार्ड क्र १४, मोहपा, ता कळमेश्वर ४) रवि जगन्नाथ हंबरडे, वय ५२ वर्षे, रा. वार्ड क्र सटवा माता मंदीर, सावनेर आणि तीन महीला आरोपी यांचे वर प्रत्येकी एक गुन्हा नोंद आहे.

**पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे आरोपी नामे १) गौतम हरिभाउ मेश्राम वय ५० वर्ष रा. धोतीवाडा २) सागर भास्कर कांबळे वय ३२ वर्ष रा. अडेगाव आणि दोन महीला आरोपी यांचे वर प्रत्येकी एक गुन्हा नोंद आहे.

**पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे आरोपी नामे १)साहेबराव विठोबा मोरे वय ५३ वर्षे रा. थुगांव देव ता. नरखेड जि. नागपुर,२) प्रेमराज मधुकर गुजवार वय ३८ वर्षे रा. घोगरा ता. नरखेड जि. नागपुर,३) उमेष उर्फे पवन बाबाराव बोंदरकर वय ४७ वर्षे रा. थुगांव देव ता. नरखेड जि. नागपुर,४) मिथुन रतनलाल गौतम वय ४५ वर्षे रा. आमनेर ता. वरूड जि. अमरावती,५) हुमेष बाबाराव बोदलकर वय ४६ वर्षे रा. सावनेर ह.मु जलालखेडा ता. नरखेड,६) अनिल साहेबराव खडसे वय ४९ वर्षे रा. भिश्णुर ता. नरखेड जि. नागपुर आणि पाच महीला आरोपी यांचेवर गुन्हे नोंद आहे.

**पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे १) बंडु रामदास वासनिक,वय ४७ वर्ष, रा पिठोरी ,तह नरखेड, जि नागपुर,२) नत्थुराव पुजाराम काटे, वय ६० वर्ष, रा वार्ड क्र ०७ नरखेड जि नागपुर,३) अरूण भैयाजी मोरे, रा वडेगाव तह नरखेड जि नागपुर, ४) रोशण चंद्रभान गजभिये वय ४५ वर्षे, रा वार्ड क्र ०५ नरखेड जि नागपुर ,५) सिध्दार्थ वामनराव तायाडे, रा खैरगाव, तह नरखेड, ६) रामेश्वर रमेशराव सातपुते, वय ३४ वर्ष, रा तिनरखेडा, ७) रामहरी चिंतामण देषभ्रतार, वय ४९ वर्षे रा सिंदी उमरी तह नरखेड जि नागपुर, ८) गंगाराम होलुराम मसराम, वय ४५ वर्षे रा चौरखैरी तह नरखेड आणि १ महीला आरोपी यांचेवर प्रत्येकी १ गुन्हे नोंद आहे.

**पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे १) निकेश रमेश तायडे वय ३५ वर्ष रा संगमा नगर काटोल ता काटोल,२) ज्ञानेश्वर दशरथ वानखेडे वय ६५ वर्ष रा.रिधोरा ३) प्रविण विजय कांबळे वय ३७ वर्ष रा.कोळंबी ता.काटोल,४) अंकुश सुरतराम सुरतकर वय ३२ वर्ष रा.गळपुरा चौक काटोल,५) प्रविण वामनराव गजभिये वय ३७ वर्ष रा.रेवतकर ले आउट काटोल,६) सुनिल उकंडराव तभाने वय ५२ वर्ष रा.बासेवार कॉम्प्लेक्स काटोल,७) प्रदिप तुकाराम ठाकरे वय ४२ वर्ष रा.येरला धोटे , ८) आशिष ओमप्रकाश जैस्वाल वय ४४ वर्ष रा. घोडे प्लॉट काटोल,९)निरजकुमार हिरदा पासवान वय ३२ रा.रेल्वे कॉलनी काटोल आणि आणि दोन महीला आरोपी यांचेवर प्रत्येकी १ गुन्हे नोंद आहे.

**पोलीस स्टेशन वेलतुर** येथे आरोपी **नामे** प्रविण महादेव देव्हारे, वय ५० वर्ष रा गोठणगाव ता कुही जि नागपुर,याचेवर गुन्हे नोंद आहे.

**पोलीस स्टेशन भिवापुर** येथे आरोपी नामे १) जितेंद्र ज्ञानेश्वर कोलते वय ४० वर्ष रा.नक्षी ता. भिवापूर जि. नागपूर,२) अर्जुन अशोक गेडाम वय १९ वर्ष रा ठाणा ता उमरेड जि नागपूर आणि १ महीला आरोपी यांचेवर प्रत्येकी १ गुन्हे नोंद आहे.

**पोलीस स्टेशन उमरेड** येथे आरोपी नामे १) उज्वल हंसराज मोहीनकर रा कावरापेठ उमरेड,

२) प्रकाश भावराव धानकाडे रा सब्जी मार्केट इतवारी उमरेड, ३) भिवा रामकुष्ना चिमुरकर रा ईतवारी पेठ उमरेड, आणि १ महीला आरोपी यांचेवर प्रत्येकी १ गुन्हे नोंद आहे.

**पोलीस स्टेशन कुही** येथे आरोपी नामे १) क्रिष्णा उपासराव ताडाम वय ६० वर्ष रा. कळमना त.जि. नागपूर, २) प्रेमदास मारोती कामठे वय ६२ वर्ष रा. वगटोली त. कुही, ३)यांचेवर प्रत्येकी १ गुन्हे नोंद आहे.

**पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** येथे आरोपी नामे १) सतिश विजय भोयर वय २७ वर्ष रा. टाकळघाट ता.हिंगणा जि.नागपुर ,२) संजय पंजाबराव मलीये वय ४२ वर्ष रा.टाकळघाट वार्ड क्र ०४ ता.हिंगणा जि.नागपुर ३) रोशन दौलत उईके वय ३४ वर्ष रा.टेभरी ता.हिंगणा जि.नागपुर यांचेवर प्रत्येकी १ गुन्हे नोंद आहे.

**पोलीस स्टेशन बोरी** येथे आरोपी नामे १) अमोल जनार्धन पानतावने वय ३० वर्षे रा सातगाव रिधोरा ता हिंगणा जि नागपुर २) चंद्रप्रकाश वासूदेव वासे वय ४५ वर्ष रा रिधोरा सातगाव ता हिंगणा जि नागपुर ३) रामचंद्र किस्तीया गडमवार वय ५६ वर्ष रा. बुटीबोरी वॉर्ड क्रमांक ०६ आंबेडकर नगर ता.जि नागपुर४) श्रीराम शंकर काकडे वय २५ वर्षे रा. वार्ड नं. १ बोरखेडी रेल्वे यांचेवर प्रत्येकी १ गुन्हे नोंद आहे.

**पोलीस स्टेशन मौदा** येथे आरोपी नामे १) आशिक मनोहर पराते वय ३२ वर्ष रा. रामनगर मौदा २) जयराम सुभाष धांडे वय ३४ वर्ष रा. पिपरी धानला ३) निकलेश मनोहर वैदय वय ३४ वर्ष रा. पेट्रोलपंप ठाणा जि. भंडारा,४) प्रभाकर कुटूंबराव घंटा वय ६४ वर्ष रा. धानला,५) किरण रामुजी धानोरकर वय ३२ वर्ष रा. चिकना ता. कामठी ,यांचेवर प्रत्येकी १ गुन्हे नोंद आहे.यांचेवर प्रत्येकी १ गुन्हे नोंद आहे.

**पोलीस स्टेशन कन्हान** येथे आरोपी नामे १) हितेश राजेंन्द्र मेश्राम वय ३२ वर्ष रा. न्यु खलासी लाईन कामठी आणि एक महीला आरोपी यांचे प्रत्येकी १ गुन्हे नोंद आहे.

**अशा आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ९७ गुन्हे दाखल केले आहे.**

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद.

**पोलीस स्टेशन कन्हान** :— दिनांक १५/०८/२०२५ रोजी कन्हान पोलीसांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, रामनगर रेल्वे स्टेशन रोड, माल धक्का जवळ, कन्हान येथे काही इसम ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी घटनास्थळी धाड टाकील असता आरोपी नामे १) प्रमोद टिकारामजी रामटेके, वय ४० वर्ष,रा. शिवनगर कन्हान, २)राजेश कमलाकरजी मानवटकर, वय ५१ वर्ष रा. जवाहर नगर कन्हान,

३)मनिष रामप्रसाद पालि वय ४७ वर्ष रा. सुरेश नगर कन्हान,हे ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळतांना मिळुन आले. पोलीसांना पाहुन पाहीजे आरोपी क्रं ४)नामे राजु हा पळुन गेला.

**पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून ५२ तासपत्ते , रोख रक्कम ३,९९०/— रूपये चार अॅड्रॉईड मोबाईल , चार दुचाकी वाहने १) होंडा अॅक्टीव्हा ५ जि मोपेड मो.सा.क्र. एम.एच.४०सि.पि. ७५३४ ,२) प्लाटिना मो.सा. क्र. एम.एच. ४० ए.सि. ००६८ ३) स्पैलेंडर मो. सा.क्र. एम.एच. ३१ डि.पी. ००५९ आणि ४) मो.सा.क्र. एम.एच. ४० बि.एम. ८२२० असा एकुण कि २,७१,९९०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

**नमुद चारही आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन कन्हान येथे कलम १२ (अ) म जु का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीस दलातर्फे स्वतंत्रदिनानिमित्य अमली पदार्थ विरोधी अभियानांतर्गत करण्यात आली जनजागृती

**दिनांक १६/०८/२०२५ रोजी स्वतंत्रदिनानिमित्याने अमली पदार्थ विरोधी जनजागृती अभियाना अंतर्गत नागपुर ग्रामीण जिल्हयात खालील प्रमाणे अंमली पदार्थ सेवनाच्या हानीकारक परिणामांबद्दल जगजागृती करून विशेष कार्यक्रम राबविण्यात आले आहे.**

**पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी :—** पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी हद्दीतील आर.सी.सी. पी.एल. कंपनी येथे श्री. दिपक अग्रवाल, सहा. पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उपविभाग नागपुर यांचे उपस्थितीत अंमली पदार्थ विरोधी अभियाना अंतर्गत कार्यक्रम घेण्यात आला. सदर कार्यक्रमात श्री. दिपक अग्रवाल आणि सपोनि श्री प्रशांत भोयर, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी यांनी कंपनीतील अधिकारी तसेच कामगारांना व्यसनाचे दुष्परिणाम, आरोग्यावर होणारे परिणाम,यावर मार्गदर्शन करून जनजागृती केली.




**पोलीस स्टेशन मौदा** :— पोलीस निरीक्षक श्री सारीन दुर्गे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन मौदा यांनी मौदा हद्दीतील हल्दीराम फुड प्रायव्हेड लिमिटेड, गुमथाळा येथे कंपनीतील अधिकारी तसेच कामगारांना व्यसनाचे दुष्परिणाम, आरोग्यावर होणारे परिणाम,यावर मार्गदर्शन करून जनजागृती केली.


OPPO A3 Pro 5G
Vrushbh




**पोलीस स्टेशन कन्हान** :— पोलीस निरीक्षक श्रीमती वैजयंती मंडवधरे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन कन्हान यांनी कन्हान एज्युकेशन टयुशन क्लासेस येथे विदयार्थ्यांना अंमली पदार्थ सेवनाच्या हानीकारक परिणामांबाबत मार्गदर्शन मार्गदर्शन करून जनजागृती करण्यात आली.



# पोलीस स्टेशन देवलापार येथे घेण्यात आली शांतता कमिटी, गणेश मंडळ पदाधिकारी, पोलीस पाटील, डीजे मालक यांची संयुक्तरित्या बैठक

आज दिनांक १६/०८/२०२५ रोजी देवलापार पोलीस स्टेशन येथे श्री रमेश बरकते उपविभागीय पोलीस अधिकारी, रामटेक उपविभाग शांतता समिती, गणेश मंडळ पदाधिकारी, पोलीस पाटील, डीजे मालक यांची संयुक्तरित्या बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत श्री रमेश बरकते उपविभागीय पोलीस अधिकारी, रामटेक उपविभाग आणि सपोनि श्री नारायण तुरकुंडे प्रभारी अधिकारी यांनी उपस्थितांना आगामी साणोत्सव पोळा, गणेश उत्सव, ईद–ए–मिलाद सणानिमित्त सुचना देववुन मार्गदर्शन केले. तसेच गणेश उत्सव आगमन ते विसर्जन पर्यंत करावयाच्या उपाययोजना मंडळातील अध्यक्षांना सांगण्यात आल्या. डॉल्बी डीजे बॉक्स चा वापर न करण्याबाबत सूचना देण्यात आल्या सदर सणोउत्सव शांततेत पार पाडुन कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणेबाबत सुचना देण्यात आल्या.





## नागपुर ग्रामीण जिल्हयातील ६४३ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक १६/०८/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २१ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ६४३ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बोरी येथे ३१ आरोपी , ,पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३४ आरोपी अशा एकुण ९५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३१ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २२ आणि पोलीस

स्टेशन वेलतुर ३१ आरोपी अशा एकुण १११ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३४ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे २६ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३१ आरोपी अशा एकुण ११८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन मौदा येथे ३१ आरोपी अशा एकुण ६२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे २८ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३२ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे ३२ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे २७ आरोपी अशा एकुण ११९ उरेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ४१ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३२ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ३४ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३१ आरोपी अशा एकुण १३८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सर्व ६ उपविभागातील सर्व २१ पोलीस स्टेशन एकुण ६४३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**


Aug 16, 2025, 13:13


पोलीस स्टेशन
पारशिवनी
फोन नं. : ०७१०२-२२५१२३


पोलीस स्टेशन,रामटेक.





मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने